**ठळक बातम्या**

- देशाला २०२९ पर्यंत नशामुक्त करण्याचा आराखडा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून सादर
- छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन
- राज्य लोकसेवा आयोग महत्त्वाच्या पूर्व परीक्षा वर्षातून किमान दोन वेळा, संगणकाच्या माध्यमातून घेणार

**आणि**

- आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-ट्वेंटी सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा भारतीय संघाचा निर्णय

**<><><><><>**

भारताला २०२९पर्यंत नशामुक्त करण्याच्या उद्दिष्टाला साध्य करण्यासाठीचा सविस्तर कृती आराखडा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मांडला. ते आज नवी दिल्लीत नार्को कोऑर्डिनेशन सेंटरच्या दहाव्या बैठकीला संबोधित करत होते. गृहमंत्र्यांनी विविध संबंधित घटकांशी सखोल चर्चा करून तयार केलेला अंमली पदार्थ नियंत्रण दृष्टीकोन दस्तऐवज २०२६-२०२९चं अनावरणही केलं. या दस्तऐवजाविषयी शहा म्हणाले....

**होल्ड बाईट - अमित शहा**

अंमली पदार्थांचा विळखा हा राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, आर्थिक हितसंबंध आणि तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचंही शहा यांनी यावेळी नमूद केलं. गेल्या १२ वर्षांत १ कोटी १८ लाख किलो ग्रॅम अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. ही आकडेवारी अंमली पदार्थाच्या तस्करीविरुद्ध सरकारची मोहीम सातत्याने प्रगती करत असल्याचं दर्शवत आहे, असं शहा यावेळी म्हणाले. अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून या समस्येविरुद्ध एकत्रित लढा देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. गृहमंत्र्यांनी या बैठकीत 'अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा' उपक्रमाचाही प्रारंभ केला. याअंतर्गत जप्त केलेल्या दोन लाख नऊ हजार पाचशे किलोग्रॅमहून अधिक अमली पदार्थांची विल्हेवाट लावली जाणार आहे.

<><><><>

जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आज नवी मुंबई पोलिसांनी ५६ कोटी ६९ लाख रुपये किमतीचा अंमली पदार्थांचा साठा नष्ट केला. नशामुक्त नवी मुंबई अभियानांतर्गत ही कारवाई करण्यात आल्याचं नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे म्हणाले. एनडीपीएस कायद्यांतर्गत नोंदवलेल्या २६ वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेले हे अंमली पदार्थ कठोर कायदेशीर आणि पर्यावरण नियमांचं पालन करून नष्ट करण्यात आले. धुळे जिल्ह्यातही एकूण २३ गुन्ह्यांत जप्त केलेले २ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ कायदेशीररित्या नष्ट करण्यात आले. गडचिरोली जिल्ह्यात आज पोलीस दलातर्फे नशामुक्त गडचिरोली मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. या मॅरेथॉनमध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

<><><><>

शेतकरी कल्याण योजनांचा लाभ जमीन कसणाऱ्या महिला शेतकऱ्यांनाही घेता यावा याकरता महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकाच्या मसुद्याला राज्य मत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. जमीन कोणाच्याही नावावर असली तरी ती कसणाऱ्या महिलांना शेकऱ्यांसाठीच्या सरकारी योजना आणि अनुदानाचा लाभ घेता येईल. अशा लाभार्थ्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्र जारी करण्याचा प्रस्ताव विधेयकात आहे. त्यात ग्रामसभा आणि नागरी स्वराज्य संस्थांचा सहभाग असेल.

हे विधेयक विधिमंडळाच्या चालू अधिवेशनात मांडण्यात येणार आहे.

<><><><>

आज केवळ प्रशासकीय सेवाच नव्हे, तर खासगी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता , संगणक तंत्रज्ञान, भाषा प्रयोगशाळा, टूल लॅब, ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक कौशल्यांकडे वळावं, अस आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज पुण्यात सारथी अर्थात छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेतर्फे आयोजित, स्पर्धा परीक्षांमधल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांच्या सन्मान सोहळ्यात बोलत होते. सारथीच्या माध्यमातून आतापर्यंत केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारो घेण्यात येणाऱ्या परिक्षेत 140, महाराष्ट्र लोकसेवा आयोग 1 हजार 124 आणि बँकिंग क्षेत्रात 500 हून अधिक तरुण-तरुणी यशस्वी झाले आहेत. विविध

कौशल्य विकास प्रशिक्षणांतून 13 हजारांहून अधिक युवक रोजगारक्षम झाले असून दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षणांचा लाभ मिळाला आहे, असं त्यांनी सांगितलं.

सारथी ही केवळ शासकीय योजना राबवणारी संस्था नसून सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि युवा सक्षमीकरणाची प्रभावी चळवळ आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी काढले.

उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, इत्यादी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

पुण्यातलं केतन अग्रवाल हत्या प्रकरण जलदगती न्यायालयात चालवायला आणि या प्रकरणी उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करायला राज्य सरकारनं मंजुरी दिली आहे. या तरुणाच्या वडिलांनी आज पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोषींना कठोर शिक्षा व्हावी यासाठी तसंच मृताच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठी वचनबद्ध असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र त्यांना आदरांजली वाहण्यात आली. तसंच त्यानिमित्त साजऱ्या होणाऱ्या सामाजिक न्याय दिनानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. ऐकुया याविषयीचा वृत्तांत...

**व्हीसी**

*(छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्यासह अनेक नेत्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. शाहू महाराज सामाजिक न्याय आणि समतेचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यांचे महान कार्य आणि आदर्श राष्ट्राला प्रेरणा देत आणि मार्गदर्शन करत राहील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत. अमित शहा म्हणाले की, एक सुसंवादी, समतावादी आणि न्यायपूर्ण भारत घडवण्याचा शाहू महाराजांचा आदर्श आजही तितकाच समर्पक आणि प्रेरणादायी आहे. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी मुंबईतल्या महाराष्ट्र लोकभवन इथे शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. कोल्हापूरमध्ये दसरा चौक इथल्या राजर्षी शाहू छत्रपती स्मारक भवनाचं लोकार्पण जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि*

*खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. तसंच जिल्हा प्रशासनाच्या वतीनं समता दिंडीही काढण्यात आली.)*

**<><><><><>**

देशभरात आज मुहर्रम पाळला जात आहे. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हौतात्म्याचं स्मरण करून देणारा हा दिवस आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मोहरम निमित्त दिलेल्या संदेशात म्हटलंय की, हजरत इमाम हुसेन यांचं कार्य सत्य आणि न्यायाप्रति वचनबद्ध राहण्याची प्रेरणा देत राहील.

संपूर्ण राज्यात प्रसिद्ध असलेली अहिल्या नगर इथली मोहर्रमची मिरवणुक आज दुपारपासून सुरु झाली आहे. या मिरवणुकीत विविध प्रकारचे ताबूत आणि सवाऱ्या नाचवल्या जात आहेत. आज रात्रभर सुरु राहणार असलेल्या या मिरवणुकीसाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. दरम्यान काल रात्री सुरु झालेली कत्तलची मिरवणूक शांततेत पार पडल्याचं आकाशवाणीच्या बातमीदारानं कळवलं आहे. सोलापूर शहरातही विविध भागांत आज पंजा सवारी अर्थात ताबुतांच्या पारंपरिक मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. धार्मिक ऐक्य, शिस्त तसंच पारंपरिक पद्धतीनं दर्शन घडवत या मिरवणूका शांततेत पार पडल्या.

**<><><><><>**

राज्य लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणारी राजपत्रित पदांसाठीची नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, गट ब अराजपत्रित पदांसाठीची तसंच गट क सेवा पूर्व परीक्षा या तीनही परीक्षा वर्षातून दोन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा घेण्यात येणार आहेत. या परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित असतील. याविषयी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार म्हणाले…

**बाइट - MPSC**

दोन किंवा जास्त पूर्व परीक्षांमधे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुख्य परीक्षा देता येईल. मुख्य परीक्षा वर्षातून एकदाच होईल. मुख्य अंतिम परीक्षा मात्र जुन्या पद्धतीने म्हणजे ऑफ लाईन होणार आहे. हा निर्णय २०२७च्या पूर्वपरीक्षांपासून लागू होईल, असं आयोगानं म्हटलं आहे.

गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची २हजार ६१९ पदांसाठीची जाहिरात काल प्रसिद्ध झाली असून ही परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित असेल असंही आयोगाने म्हटलं आहे.

तसंच लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनेक विद्यार्थी उत्तीर्ण होतात, सर्वांना सरकारी नोकरी मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांना आता त्यांच्या क्षमतांनुसार खाजगी औद्योगिक कंपन्यांमध्ये नोकरी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी उद्योग विभागाशी संपर्क करण्यात आला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

भारतीय क्रिकेट संघाच्या आयर्लंड दौऱ्यात आज पहिला टी ट्वेंटी सामना बेलफास्ट इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून आयर्लंडला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा आयर्लंडच्या १३ षटकात ४ बाद १०२ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//